# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

## खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ

पुढारी

# वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळण्याची गरज

### न्यायाधीश एन. के. ब्रह्मे यांचे प्रतिपादन

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

रस्त्यावर प्रवास करताना आपण स्वत: सुरक्षित राहून समोरच्यालाही सुरक्षित ठेवायचे असेल तर सर्वांनीच वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळण्याची गरज असल्याचे प्रतिपादन राजगुरुनगर अतिरिक्त सत्र तथा जिल्हा न्यायालयाचे न्यायाधीश एन. के. ब्रह्मे यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात तालुका विधी सेवा समिती, खेड बार असोसिएशन आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने आयोजित कायदेविषयक शिबिरात ते बोलत होते. या वेळी जिल्हा न्यायाधीश ए. एम. अंबाळकर, सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर के. एच. पाटील, सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर डी. बी. पतंगे, संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, खेड बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. एस. व्ही. कड, प्रादेशिक परिवहन अधिकारी आनंद पाटील, सहपरिवहन अधिकारी प्रियांका दडस,




हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात बोलताना न्या. एन. के. ब्रम्हे.

चाकण वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक डी. एम. कौंडे देशमुख, संचालक बाळासाहेब सांडभोर, ॲड. माणिक पाटोळे, प्राचार्य डॉ. एच.एम. जरे, उपप्राचार्य एस. एन. टाकळकर उपस्थित होते.

या शिबिरात विविध विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. त्यामध्ये ॲड. साधना बाजारे यांनी नागरिकांची कर्तव्ये या विषयावर बोलताना विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद, सार्वजनिक स्वच्छता, देशहिताला प्राधान्य, राज्यघटनेचे पालन, स्त्रियांचा सन्मान करण्याचे आवाहन केले.

प्रादेशिक परिवहन अधिकारी आनंद पाटील म्हणाले, वाहन चालवताना चालकाने वेगावरील नियंत्रण, सिट बेल्ट बांधणे, दुचाकी चालविताना हेल्मेटचा वापर करावा. मोबाईलवर बोलणे टाळावे. सिग्नल तोडू नये आदी नियमांचा अवलंब करण्याचे आवाहन केले. जिल्हा न्यायाधीश ए. एम. अंबाळकर यांनी वाद निवारण करण्यासाठी मध्यस्थी, लोकअदालत अथवा लवादाच्या माध्यमातून प्रयत्न करताना संवाद व सहमतीवर भर देण्याचे आवाहन केले. ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी या कायदेविषयक शिबिराचे महत्त्व अधोरेखित करताना वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी स्वयंशिस्त आवश्यक असल्याचे सांगून यासाठी जनजागृतीची गरज व्यक्त केली. सूत्रसंचालन ॲड. शुभम घाडगे यांनी केले. स्वागत डॉ. संजय शिंदे यांनी केले. ॲड. सागर मैड यांनी आभार मानले.

My Gramin Edition
24 Jan, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

# वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळा

## राजगुरूनगरात जिल्हा न्यायाधीश ब्रह्मे यांचे आवाहन

**राजगुरूनगर दि. २३ (प्रतिनिधी)** - रस्त्यावर प्रवास करताना आपण स्वत: सुरक्षित राहून समोरच्यालाही सुरक्षित ठेवायचे असेल तर सर्वांनीच वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळण्याची गरज असल्याचे प्रतिपादन जिल्हा न्यायाधीश एन. के. ब्रह्मे यांनी केले.

राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात तालुका विधी सेवा समिती, खेड बार असोसिएशन आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने आयोजित कायदेविषयक शिबिरात ते बोलत होते. याप्रसंगी जिल्हा न्यायाधीश ए. एम. अंबाळकर, सहदिवाणीन्यायाधीशवरिष्ठस्तर के. एच. पाटील, सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठस्तर डी. बी. पतंगे, संस्था अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेबपाटील, खेड बार असोसिएशनचे अध्यक्ष अ‍ॅड. एस. व्ही. कड, प्रादेशिक परिवहन अधिकारी आनंद पाटील, सहपरिवहन अधिकारी प्रियंका दडस, चाकण वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक डी. एम. कोंडे देशमुख, संचालक बाळासाहेब सांडभोर, अ‍ॅड. माणिक पाटोळे, अ‍ॅड. आरती टाकळकर, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य एस. एन. टाकळकर उपस्थित होते. या शिबिरात अ‍ॅड. साधना बाजारे यांनी 'नागरिकांची कर्तव्ये' या विषयावर बोलताना विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद, सार्वजनिक स्वच्छता, देशहिताला प्राधान्य, राज्यघटनेचे पालन, स्त्रियांचा सन्मान करण्याचे आवाहन केले. प्रादेशिक परिवहन अधिकारी आनंद पाटील यांनी वाहतुकीचे नियम या विषयावर मार्गदर्शन करताना वेगावरील नियंत्रण, सिट बेल्ट, हेल्मेटचा वापर, वाहन चालविताना मोबाइलवर न बोलणे, सिग्नल न तोडणे आदी नियमांबाबत आवाहन केले. सहदिवाणी न्यायाधीश डी. बी. पतंगे यांनी वाहन चालकाची वेगावर नियंत्रण ठेवून वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत सांगितले. जिल्हा न्यायाधीश ए. एम. अंबाळकर यांनी वाद निवारण करण्यासाठी मध्यस्थी, लोकअदालत अथवा लवादाच्या माध्यमातून प्रयत्न करताना संवाद व सहमतीवर भर देण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी, सूत्रसंचालन अ‍ॅड. शुभम गाडघे यांनी, स्वागत अ‍ॅड. डॉ. संजय शिंदे यांनी तर अ‍ॅड. सागर मैड यांनी आभार मानले.




**राजगुरूनगर : येथील महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना न्यायाधीश एन. के. ब्रह्मे.**


प्रभात Fri, 24 January 2020
epaper.eprabhat.net/c/48284042

लोकमत

न्यायाधीश एन. के. ब्रह्मे : हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात कायदेविषयक शिबिर

# वाहतुकीचे नियम सर्वांनीच काटेकोरपणे पाळण्याची गरज

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर** : रस्त्यावर प्रवास करताना आपण स्वत: सुरक्षित राहून समोरच्यालाही सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे. सर्वांनीच वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळण्याची गरज असल्याचे प्रतिपादन जिल्हा न्यायाधीश एन. के. ब्रह्मे यांनी केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात तालुका विधी सेवा समिती, खेड बार असोसिएशन आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने कायदेविषयक शिबिर पार पडले. शिबिरात मार्गदर्शन करताना ब्रह्मे बोलत होते.

या वेळी जिल्हा न्यायाधीश ए. एम. अंबाळकर, सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर के. एच. पाटील, सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर डी. बी. पतंगे, संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, खेड बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. एस. व्ही. कड, प्रादेशिक परिवहन अधिकारी आनंद पाटील, सहपरिवहन अधिकारी प्रियंका दडस, चाकण वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक डी.एम. कौंडे देशमुख, संचालक बाळासाहेब सांडभोर, ॲड. माणिक पाटोळे, प्राचार्य डॉ. एच.एम. जरे, उपप्राचार्य एस.एन. टाकळकर उपस्थित होते.




हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात कायदेविषयक शिबिरात मार्गदर्शन करताना जिल्हा न्यायाधीश एन. के. ब्रह्मे.

> वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी नियम पाळणे आवश्यक आहे. सर्वांनीच स्वयंशिस्त बाळगण्याची गरज आहे. त्यासाठी व्यापक जनजागृतीची गरज आहे.
>
> - ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, संस्थाध्यक्ष

सह दिवाणी न्यायाधीश डी. बी. पतंगे यांनी वाहनचालकाची वेगावर नियंत्रण ठेवून वाहतुकीचे नियम पाळण्यात खरी हिरोगिरी असल्याचे सांगितले. जिल्हा न्यायाधीश ए. एम. अंबाळकर यांनी वाद निवारण करण्यासाठी मध्यस्थी, लोकअदालत अथवा लवादाच्या माध्यमातन प्रयत्न करताना संवाद व सहमतीवर भर देण्याचे आवाहन केले.

प्रास्ताविकात ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी या कायदेविषयक शिबिराचे महत्त्व अधोरेखित केले. सूत्रसंचालन ॲड. शुभम गाडगे यांनी, स्वागत डॉ. संजय शिंदे यांनी, आभार ॲड. सागर मैड यांनी मानले.

- शिबिरात विविध विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. ॲड. साधना बाजारे यांनी नागरिकांची कर्तव्ये या विषयावर बोलताना विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद, सार्वजनिक स्वच्छता, देशहिताला प्राधान्य, राज्यघटनेचे पालन, स्त्रियांचा सन्मान करण्याचे आवाहन केले.
- प्रादेशिक परिवहन अधिकारी आनंद पाटील यांनी वाहतुकीचे नियम या विषयावर मार्गदर्शन करताना चालकांचे वेगावरील नियंत्रण, सिट बेल्ट बांधणे, दुचाकी चालविताना हेल्मेटचा वापर करणे, वाहन चालविताना मोबाईलवर बोलणे टाळावे, सिग्नल न तोडणे आदी नियमांचा अवलंब करण्याचे आवाहन केले.

# वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळण्याची गरज : न्यायाधीश एन. के. ब्रह्मे

राजगुरुनगर : रस्त्यावर प्रवास करताना आपण स्वत: सुरक्षित राहून समोरच्यालाही सुरक्षित ठेवायचे असेल तर सर्वांनीच वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळण्याची गरज असल्याचे प्रतिपादन जिल्हा न्यायाधीश एन. के. ब्रह्मे यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात तालुका विधी सेवा समिती, खेड बार असोसिएशन आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने आयोजित कायदेविषयक शिबिरात बोलत होते.



या प्रसंगी जिल्हा न्यायाधीश ए. एम. अंबाळकर, सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर के. एच. पाटील, सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर डी. बी. पतंगे, संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, खेड बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. एस. व्ही. कड, प्रादेशिक परिवहन अधिकारी आनंद पाटील, सहपरिवहन अधिकारी प्रियंका दडस, चाकण वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक डी.एम.कौंडि देशमुख, संचालक बाळासाहेब सांडभोर, ॲड. माणिक पाटोळे, प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य एस.एन.टाकळकर उपस्थित होते.

या शिबिरात विविध विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. त्यामध्ये ॲड. साधना बाजारे यांनी नागरिकांची कर्तव्ये या विषयावर बोलताना विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद, सार्वजनिक स्वच्छता, देशहिताला प्राधान्य, राज्यघटनेचे पालन, स्त्रियांचा सन्मान करण्याचे आवाहन केले.

प्रादेशिक परिवहन अधिकारी आनंद पाटील यांनी वाहतुकीचे नियम या विषयावर मार्गदर्शन करताना चालकांचे वेगावरील नियंत्रण, सिट बेल्ट बांधणे, दुचाकी चालविताना हेल्मेटचा वापर करणे, वाहन चालविताना मोबाईलवर बोलणे टाळावे, सिग्नल न तोडणे आदि नियमांचा अवलंब करण्याचे आवाहन केले.

सह दिवाणी न्यायाधीश डी. बी. पतंगे यांनी वाहन चालकाची वेगावर नियंत्रण ठेवून वाहतुकीचे नियम पाळण्यात खरी हिरोगिरी असल्याचे सांगितले.

जिल्हा न्यायाधीश ए. एम. अंबाळकर यांनी वाद निवारण करण्यासाठी मध्यस्थी, लोकअदालत अथवा लवादाच्या माध्यमातून प्रयत्न करताना संवाद व सहमतीवर भर देण्याचे आवाहन केले. प्रास्ताविकात ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी या कायदेविषयक शिबिराचे महत्त्व अधोरेखित करताना वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी स्वयंशिस्त आवश्यक असल्याचे सांगून यासाठी जनजागृतीची गरज व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. शुभम गाडघे यांनी, स्वागत ॲड. डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार ॲड. सागर मैड यांनी मानले.

दै. सकाळ

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख